महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेच्या कर्जाची मर्यादा रु.२०,०००/- वरुन रु.५०,०००/- पर्यंत वाढविण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : अपंग २०१७/प्र.क्र.७२०/महामंडळे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :२१ डिसेंबर, २०१८

वाचा :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अविम-२००३/प्र.क्र.१२९/सुधार ३, दि. ३१/०३/२००५.

प्रस्तावना :-

अपंगाना स्वतःच्या पायावर उभे राहावे व समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेता यावे यासाठी त्यांना स्वतःचा उद्योग वा स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी कर्ज रूपाने आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रु. २०,००० /- चे थेट कर्ज महामंडळाकडून देण्याची योजना राबविण्यात येत आहे. जास्तीत जास्त अपंगाना कर्ज योजनांचा लाभ घेता यावा आणि महामंडळाच्या योजना प्रभाविपणे राबविता याव्यात ही बाब विचारात घेऊन, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेअंतर्गत कर्जाची मर्यादा रु.२०,०००/- वरुन रु.५०,०००/- पर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनांचा लाभ जास्तीत जास्त अपंगाना घेता यावा आणि महामंडळाच्या योजना प्रभाविपणे राबविता याव्यात ही बाब विचारात घेऊन, थेट कर्ज योजनेअंतर्गत कर्जाची मर्यादा रु.२०,०००/- वरुन रु.५०,०००/- या शासन निर्णयाद्वारे वाढविण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे असेल :-

प्रकल्प मुल्य	रु. ५०,०००/- पर्यंत
महामंडळाचा सहभाग	रु. ४७,५००/- (९५ % पर्यंत)
अर्जदाराचा सहभाग	रु.२,५००/- (०५ % पर्यंत)
व्याजदर	२ %
परतफेड कालावधी	३ वर्षे (३६ हप्ते)

३. योजनेचा उद्देश:-

१. अपंगांना आर्थिकदृष्टया सक्षम करणे. तसेच, बँकेमार्फत कर्ज देताना येणा-या अडचणी व कर्ज मंजूर होताना होणारा विलंब टाळणे,

२. शासनाच्या कौशल्य विकास विभागामार्फत तसेच, शासकीय/निमशासकीय संस्थांमधून तांत्रिक प्रशिक्षण घेतलेली अपंग अनुभवी तरुण मुले/मुली यांना प्राधान्याने स्वयंरोजगारास कर्ज उपलब्ध करुन देणे,
३. अपंगांना लहान /लघु व्यवसाय करण्याकरीता तात्काळ वित्त पुरवठा करणे,
४. सदर योजनेत साधारणपणे समाविष्ट लघु व्यवसाय उदा. मोबाईल सर्व्हिसिंग/रिपेअरींग, इलेक्ट्रीशियन, इलेक्ट्रॉनिक वस्तू रिपेअरिंग (फ्रीज, ए.सी., टि.व्ही., मायक्रोवेव्ह, लॅपटॉप, कॉम्प्युटर हार्डवेअर इ.) ब्युटीपार्लर, ड्रेस डिझायनिंग, टेलरिंग, फुड प्रॉडक्टस् /प्रोसेसिंग, किराणा दुकान, जनरल / स्टेशनरी स्टोअर, मेडिकल स्टोअर, फॅब्रिकेशन/वेल्डींग, हार्डवेअर व सॅनेटरी शॉप, प्रिंटींग, शिवणकला, झेरॉक्स/लॅमिनेशन, हॉटेल, कॅटरिंग सर्व्हिसेस, मंगल कार्यालय, मंडप डेकोरेशन इ., क्रिडा साहित्य/स्पोर्टस् शॉप, फास्ट फूड सेंटर/ज्यूस सेंटर, क्लॉथ / रेडिमेड गारमेंट शॉप, मोटार मेकॅनिक / रिपेअर इ, कर्ज शिलाई मशीन, कॉफी वेंडिंग मशीन, हॉकर्स, स्टॉल, ज्यूस सेंटर, पानठेला, शेतीशी निगडीत पूरक/जोडव्यवसाय इ. साठी वित्त पुरवठा करणे,
५. ज्या कारणासाठी कर्ज घेतले जाईल त्या बाबीवर महामंडळाचा कर्जफेड होईपर्यंत हक्क राहील,
६. उक्त योजनेत साधारणपणे पुरुष व महिला यांना ५० % आरक्षण, ग्रामीण भागासाठी प्राधान्य राहील. तसेच, राज्य स्तरावरील क्रिडा पुरस्कार प्राप्त व्यक्तींना प्राधान्य राहील,

४. अटी व शर्ती :-

१. सदर कर्जातून लाभार्थीसाठी जी मत्ता निर्माण होणार आहे ती मत्ता अचल (Immovable) असेल तर परस्पर महामंडळाकडे गहाण (Mortgage) ठेवण्यात यावी. जर ती मत्ता चल (Movable) असेल तर ती महामंडळाकडे तारणगहाण (Hypothecate) करण्यात यावी,
२. कर्ज परतफेडीबाबत लाभार्थीकडून शपथपत्र घेण्यात यावे,
३. जामीनदार एक असेल. लाभधारकाने तारणासाठी सादर केलेल्या जामीनदाराकडे दिलेल्या कर्जाइतकी स्थावर मालमत्ता असावी. शासकीय /निमशासकीय जामीनदाराची अट शिथिल करण्यात येत आहे.
४. लाभार्थ्याने स्थापन केलेल्या व्यवसायाचा विमा स्वखर्चाने उतरविणे तसेच दरवर्षी विम्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक राहील,
५. या योजनेवर होणारा खर्च शासनाने महामंडळासाठी मंजुर केलेल्या भाग भांडवलाच्या तरतुदीच्या मर्यादेत राहून करण्यात यावा,
६. महामंडळाने आपला भांडवली अर्थसंकल्प विहित कालमर्यादेत शासनाकडून मान्य करुन घेणे बंधनकारक आहे,
७. मुद्दल व व्याजासह कर्जाच्या वसुलीचा तपशील महामंडळाने भांडवली अर्थसंकल्पात देणे बंधनकारक राहील,

५. **लाभार्थ्यांची पात्रता / निकषः-**

१. ४०% हून जास्त कायमस्वरुपी अपंगत्व असलेला लाभार्थी कर्जासाठी पात्र असेल मात्र गंभीर स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना प्रथम व प्राधान्याने कर्ज देण्याचा विचार केला जाईल,
२. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा,

३. अर्जदाराचे वय किमान १८ ते ६० असावे,
४. अर्जासोबत अपंगत्व दाखला, फोटो, वयाचा दाखला, उत्पनाचा दाखला व आधार कार्ड जोडावे,
५. अर्जदाराने आधार कार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा,
६. व्यवसायाच्या जागेबाबत पुरावा सादर करणे बंधनकारक राहील,
७. प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण घेतले असल्यास त्याचे प्रमाणपत्र सादर करावे,
८. अर्जदार महामंडळाच्या कोणत्याही (केंद्र व राज्य) योजनेचा व कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

६. कर्ज वितरण कार्यपद्धती:-

कर्ज योजनांसाठी योग्य लाभार्थ्यांची निवड करण्याची तसेच महामंडळामार्फत देण्यात येणा-या कर्जाच्या वसुलीची संपूर्ण जबाबदारी जिल्हास्तरीय कार्यालयाची राहील. याबाबत साधारणपणे पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात यावी. त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार महामंडळास राहतील. या सुधारित योजनेअंतर्गत कर्ज मिळण्यासाठी लाभार्थ्यांना नव्याने अर्ज करावा लागेल.

१. लाभार्थी निवड समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल,
२. जिल्हा व्यवस्थापक योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील,
३. विहित मुदतीत अर्ज Online अथवा Offline किंवा दोन्ही पद्धतीने स्विकारण्यात येतील,
४. कर्ज मागणी अर्जाची मुदत त्या संबंधीत आर्थिक वर्षासाठीच असेल (दि. १ एप्रिल ते ३१ मार्च).
५. जिल्हा व्यवस्थापक प्राप्त अर्जाची संपूर्ण छाननी/तपासणी करुन लाभार्थ्यांची यादी तयार करून महामंडळाच्या मुख्य कार्यालयाला सादर करतील. यासाठी पुढील बाबी विचारात घेणे अनिवार्य राहील :-

अ) उद्योग / व्यवसायाची वर्धनक्षमता,
ब) लाभार्थ्यांची सक्षमता / व्यवसायाचे ज्ञान,
क) परतफेडीची क्षमता / जामीनदारांची क्षमता.

७. कर्ज वसुली कार्यपद्धती:-

१. कर्जाची परतफेड महामंडळाच्या नियमानुसार राहील,
२. कर्ज परताव्याचे मासिक हप्ते ठरवून द्यावेत व कर्ज वसुलीच्या दृष्टीने लाभार्थ्यांकडून पुढील दिनांकाचे आगावू धनादेश घेऊन तसेच ECS (इलेक्ट्रॉनिक क्लिअरंस सिस्टिम) पध्दतीने वसुली करण्यात यावी,
३. एवढे करुनही वसुली न झाल्यास महामंडळाकडे ठेवलेल्या तारणाद्वारे तसेच जामीनाद्वारे कर्ज वसुली करण्यात यावी.

८. महामंडळाने एक वर्षानंतर थेट कर्ज योजनेचा फेर आढावा घ्यावा. यातील लाभार्थ्यांची निवड व वसुलीचे प्रमाण याबाबतच्या यशापयशावर योजना पुढे चालू ठेवण्याबाबतचा निर्णय महामंडळाने घ्यावा. एक वर्षानंतर याबाबतची सविस्तर माहिती शासनास सादर करावी. सदर योजनेचे समवर्ती मूल्यमापन (Concurrent Evaluation) महामंडळाने करुन घ्यावे.

९. ज्या लाभार्थ्यांनी यापूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड केलेली नाही, अशा लाभार्थ्यांना संपूर्ण परतफेड करेपर्यंत नविन कर्जाचा लाभ घेता येणार नाही.

१०. थेट कर्ज योजनेची परिणामकारक अंमलबजावणी व लाभार्थींना विनातक्रार कर्ज उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने येणा-या अडचणींबाबत महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत धोरणात्मक निर्णय घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. प्रस्तुत योजनेवरील खर्च महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या भाग भांडवलातून करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८१२२११६४४२७७९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil D Sardar

Digitally signed by Sunil D Sardar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, cn=Sunil D Sardar
Date: 2018.12.21 16:49:16 +05'30'

(सुनिल सरदार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति-

१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ (मर्या.), मुंबई,
२. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

प्रत:-

१. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
२. सर्व सन्माननीय विधानसभा /विधान परिषद सदस्य,
३. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अप्पर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई,
४. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. सह सचिव (महामंडळे / अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई/नागपूर,
१०.अधिदान व लेखा अधिकारी / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११.सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३.कक्ष अधिकारी (का.अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१४.निवडनस्ती (का.महामंडळे).